# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मुंबईतील चेंबूर येथे सन १९४७ साली फाळणीच्या वेळी पाकिस्तानातून स्थायिक झालेल्या सिंधी बांधवाबाबत

**(१) ६८१४ (०६-०४-२०१५). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर येथे सन १९४७ साली झालेल्या फाळणीच्या वेळी पाकिस्तानातून सिंधी बांधव स्थायिक झाले असून शासनाने त्यांना सनद दिली असल्याने सिंधी बांधवाची मोठी वसाहत आहे, या वसाहतीमधील इमारती मोडकळीस आल्या असून सर्व वसाहती बी सत्ता (B-enure) प्रकारात मोडत असल्याने इमारतीचा पुनर्विकास रखडलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीचा पुनर्विकास करता यावा म्हणून बी सत्ता (B-Tenure) मधून ए सत्ता (A-Tenure) मध्ये करण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०५-२०१९) :** (१), (२) व (३) भारत पाकिस्तान फाळणीच्या वेळी पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या निर्वासितांना/विस्थापितांना भरपाई संकोष मालमत्ता (Compensation Pool Properties) मधून देण्यात आलेल्या भूखंडाच्या धारणाधिकाराचे स्वत:हून सर्व्हेक्षण करुन पुनर्विलोकन करण्याबाबत शासनाने क्र.जमीन-२०१५/प्र.क्र.२४०/ज-१, दि.१४.०६.२०१८ च्या शासन परिपत्रकान्वये धोरणात्मक निर्णय घेतला आहे. त्यानुसार भरपाई संकोष मालमत्तेमधून दिलेल्या अथवा अशा भरपाई संकोष मालमत्तेवरील अतिक्रमण नियमानुकूल करुन दिलेल्या निवासी व वाणिज्यिक भूखंडाचे स्वत:हून सर्व्हेक्षण करुन भोगवटादार वर्ग-२ अथवा ब/ब-१/ब-२ सत्ता प्रकार आढळल्यास त्याचे स्वत:हून पुनर्विलोकन करुन त्याऐवजी अधिकार अभिलेखात अ-१ सत्ताप्रकार व भोगवटादार वर्ग-१ हा धारणाधिकार नमूद करण्याची कार्यवाही करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे टेंभूर्णी (ता माढा, जि.सोलापूर) येथील औद्योगिक वसाहतीमधील शुध्दीकरण केंद्र ते पंपहाऊस (अकोले बु/फुटजळगांव) या रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत**

**(२) ७०४४६ (२७-०१-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे टेंभूर्णी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील औद्योगिक वसाहतीमधील शुध्दीकरण केंद्र ते पंपहाऊस (अकोले बु/ फुटजळगांव) या खराब रस्त्यासाठी निधी उभारून रस्ता दुरूस्त करण्याची मागणी मा. उद्योग मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी, माढा यांनी दिनांक १८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे कय,

(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय,

(३) असल्यास, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सार्वनिक बांधकाम विभागाकडे कोणतेही निवेदन प्राप्त झालेले नाही. तथापि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे सदर निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येते.

(२) होय, उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, कुर्डुवाडी यानी पाहणी केली आहे.

(३) प्रश्नांकीत रस्त्याची एकुण लांबी १०.०० कि.मी. असून यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत एकुण ६.५० कि.मी. लांबी आहे. यामधील प्रजिमा ४ वरील २.५० कि.मी. लांबीपैकी १.६० कि.मी. लांबी सुस्थितीत असून उर्वरीत ०.९० कि.मी. लांबीचे काम अर्थसंकल्प २०१६-१७ मध्ये मंजूर असून सद्य:स्थितीत काम प्रगतीपथावर आहे. तर प्रजिमा १५ ची उर्वरीत ४.०० कि.मी. लांबी सुस्थितीत असून या रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

प्रश्नांकित १०.०० कि.मी. रस्त्याच्या लांबीपैकी ३.०० कि.मी. लांबी ही योनाबाहय असून इजिमा ११३ वरील ०.५०० मी लांबी जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत आहे. या लांबीमध्ये प्रधानमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेसाठी दारिद्रय रेषेची लावण्यात आलेली अट रद्द करण्याबाबत**

**(३) ८११७५ (१५-०४-२०१७). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेसाठी दारिद्रय रेषेची लावण्यात आलेली अट रद्द करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांचेकडे दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दारिद्रय रेषेऐवजी किमान ३० हजार रुपये उत्पन्नाचे निकष लावून उत्पन्नाच्या दाखल्याच्या आधारावर या योजनेचा लाभ देण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधींनी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०४-२०१९) :** (१) व (२) अंशत: खरे आहे, दिनांक १७/११/२०१४ च्या पत्रान्वये वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. ४०,०००/- करणेबाबत विनंती केली होती.
(३) मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार महिला व बाल विकास विभागाने दिनांक ०१/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये माझी कन्या भाग्यश्री ही योजना नव्याने सुरु केली आहे. सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक व माझी कन्या भाग्यश्री या दोन्ही योजनांचा उद्देश व स्वरुप जवळजवळ सारखेच असल्याने सावित्रीबाई फुले कन्या कल्याण पारितोषिक योजना मंत्री मंडळाच्या निर्णयानुसार दिनांक १९/०९/२०१७ च्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आली आहे. तसेच महिला व बालविकास विभागाने सुरु केलेल्या योजनेत लाभार्थ्यांची उत्पन्नाची मर्यादा रुपये ७,५०,०००/- केली असून लाभाच्या रकमेत सुध्दा वाढ केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिक्षेत्रातील अ, ब, क आणि ड परिक्षेत्राच्या सिमांतिक भूभागांची पडताळणी व केलेल्या प्रक्रियांची माहिती उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४) ८६५२२ (२३-०८-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या परिक्षेत्रातील नागरिकांना व भोगवटदरांना त्यांच्या आधीन जमाती व तत्सम पारंपारीक वन निवासी आदिवासी बांधवांकरिता यथास्थिती मुख्य वन संरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान यांनी उल्लेखिलेल्या अनुक्रमे अ, ब, क आणि ड परिक्षेत्राच्या सिमांतिक भूभागांची पडताळणी व केलेल्या प्रक्रियांची माहिती उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानीय सर्वसामान्य नागरिक व जनप्रतिनिधी, नागरी संघटना यांनी मा.मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री(नगरविकास), मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव (नगरविकास), अतिरिक्त मुख्य सचिव (वने व महसूल), महापालिका आयुक्त तसेच त्यांच्या अधिनस्त नागरी सेवांचे प्राधिकारी यांच्याकडे दिनांक २६ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी बृहन्मुंबई महानगरातील उत्तर-पूर्व व पश्चिम परिक्षेत्रातील अनुक्रमे नगरविकास, वानिकी, वन्यप्राणी, पर्यावरण विषयक बाबींवर कठोर उपाययोजना करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्याचे प्रस्तावित केले आहे,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार महापालिका व खासगी संस्थांच्या बाबतीत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०६-२०१९) :** (१) व (२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन परिक्षेत्राच्या सिमातिक भूभागांची अ, ब, क आणि ड अशी वर्गवारी करण्यात आलेली नाही. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात वन व्यवस्थापनाचे अनुषंगाने मंजूर व्यवस्थापन आराखडया नुसारच कामे करण्यात येतात.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयामधील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय व शासकीय वैद्यकिय महाविद्यालयातील रिक्त पदांबाबत

**(५) ९५०५७ (२७-१२-२०१७). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्हातील छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय व शासकीय वैद्यकिय महाविद्यालयात मुख्य प्रशासकीय अधिकारी-१, प्रशासकीय अधिकार-२ तसेच वर्ग ३ व ४ ची पदे मोठया प्रमाणात रिक्त् असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्ग ४ ची एकूण मंजूर पदे ३१८ पैकी ११० रिक्त पदांमुळे रुग्णांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर सर्व रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०५-२०१९) :** (१) होय.
(२) छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूरकरिता गट-ड संवर्गात मंजूर ३१८ पदांपैकी १२२ पदे रिक्त असली तरी बाहयस्त्रोताद्वारे तसेच वर्ग-४ संवर्गातील कार्यरत कर्मचाऱ्यांकडून स्वच्छतेचे व रुग्णसेवेचे काम करुन घेण्यात येते.
(३) व (४) वर्ग-१ ते वर्ग-३ संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने व पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. गट-ड संवर्गातील सरळसेवा कोटयातील पदभरतीवर निर्बंध आहेत. तथापि, अनुकंपा तत्त्वावर व लाडपागे समिती शिफाशीनुसार काही पदे भरण्यात येत आहेत.

---

**पालघर येथील माता-बाल केंद्रात अद्ययावत सुविधा व डॉक्टरांचा अभाव असल्याबाबत**

**(६) १००१२१ (०४-०१-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मधील सर जे.जे. रुग्णालया यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या पालघर जिल्हयातील माता-बाल केंद्र इमारतीची दुरवस्था झाली असून डॉक्टरांची कमतरता व प्रसुती शस्त्रक्रियासाठी सुविधांची अभाव असल्यामुळे गर्भवती महिलांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०५-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

पालघर येथील आरोग्य पथक केंद्रातील बालसंगोपन केंद्राची इमारत जुनी असून संस्थेतील ड्रेनेज, पाईप लाईन व चेंबर दुरुस्तींची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. संस्थेतील इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. स्ट्रक्चरल ऑडीटच्या अनुषंगाने विविध दुरुस्ती व विद्युत कामांविषयीच्या प्राप्त प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे. सदर प्रशिक्षण केंद्र हे वैद्यकीय विद्यार्थ्यांना ग्रामीण आरोग्याबाबतच्या प्रशिक्षणाचे असल्यामुळे तेथे ०१ स्त्री वैद्यकीय अधिकारी व ०१ सहायक वैद्यकीय अधिकारी २४ तास वैद्यकीय सेवा देतात. सदर संगोपन केंद्रामध्ये तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्यामुळे निव्वळ प्रसुतीची कामे हाताळण्यात येतात. गुंतागुंतीच्या प्रसुतीकरीता येणाऱ्या रुग्णांना शासकीय रुग्णालयांमध्ये संदर्भीत करण्याची कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटकोपर (मुंबई) मधील कामराजनगर खाडीच्या जागेवर तिवरांची तोड करण्यात येत असल्याबाबत**

**(७) १००६१९ (३०-१२-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपरमधील कामराजनगर परिसरातील कोकणवैभव चाळी लगत असलेल्या खाडीच्या जागेवर भूमाफियांकडून तिवरांची राजरोसपणे तोड करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाढत्या प्रदुषणाला प्रतिबंध घालण्यासाठी झाडे लावण्याचा संदेश शासनाकडून दिला जात असताना दुसरीकडे तिवरांची सर्रासपणे तोड केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जागेवर भरणी टाकून त्या जागेवर पत्र्याच्या झोपडया व कालांतराने याठिकाणी पक्की घरे भूमाफियांकडून मोठया प्रमाणात उभारली जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी वा पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०५-२०१९) :** (१) व (२) मौजे घाटकोपर न.भु.क्र.१९४ ब सर्व्हे क्र. २३६ पै. मध्ये अनधिकृत २२ झोपड्या आढळून आलेल्या होत्या. सदर झोपड्यांचे दिनांक ११.१.२०१७ रोजी निष्कासन करण्यात आले.

सदर क्षेत्रामध्ये फेब्रुवारी/मार्च २०१८ दरम्यान पुन्हा अतिक्रमण करण्याचा प्रयत्न निदर्शनास येताच दिनांक २६, २७, २८ एप्रिल, २०१८ रोजी महसूल विभाग, पोलीस विभाग, मुंबई महानगरपालिका यांनी संयुक्तपणे निष्कासनाची मोहिम राबवून सदर जागेवरील २०७ झोपड्या निष्कासित केल्या आहेत.

वन विभागाच्या ताब्यातील क्षेत्रामध्ये अनधिकृत अतिक्रमणाविरुद्ध वन गुन्ह्यांची नोंद करुन भारतीय वन अधिनियम, १९२७ अंतर्गत कायदेशीर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच इतर कांदळवन क्षेत्रात देखील अतिक्रमणाविरुद्ध संबंधित विभागाला अतिक्रमण निष्कासन करण्याकरिता सहकार्य वन विभागाकडून करण्यात येत आहे.

भारतीय वन सर्व्हेक्षण संस्थेच्या भारतीय वन स्थिती अहवाल, २०१७ अनुसार राज्यातील कांदळवन क्षेत्रामध्ये सन २०१५ च्या तुलनेत ८२ चौ.कि.मी. ने वाढ झाल्याचे नमूद करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) मुंबई कांदळवन संधारण घटकाकडे मुंबई, मुंबई उपनगर व नवी मुंबई मधील हस्तांतरित करण्यात आलेले राखीव वने म्हणून अधिसूचित झालेले कांदळवन क्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करण्यात येत आहे. त्यानुसार वन विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्रावर असणारी सुमारे ५०६८ अनधिकृत बांधकामे निष्कासित करुन कांदळवन क्षेत्रामध्ये भराव करत असताना ४६ वाहने जप्त करण्यात आलेली आहेत. याशिवाय ५४ आरोपींना अटक करुन काही आरोपींविरुद्ध न्यायालयामध्ये खटले दाखल करण्यात आलेले आहेत.

तसेच राज्यातील सागर तटीय जिल्ह्यांमधील कांदळवनाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोंकण यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे.

---

### कोल्हापूर (जि.कोल्हापूर) रेल्वे स्थानकातील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(८) १००८२५ (२९-१२-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर (जि.कोल्हापूर) रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म नं.२ व ३ ला जोडणारा पूल अत्यंत धोकादायक असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पुलाची रेल्वे प्रशासन वा शासनाकडून दुरुस्ती करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, या पूलाच्या दुरुस्तीबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०५-२०१९) :** (१)नाही.
(२) व (३) सदर पुलाची वर्षातून एकदा तपासणी करण्यात येते व आवश्यकतेनुसार वेळोवेळी दुरुस्ती व देखभाल करण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील ॲसिड हल्ला, बलात्कार पिडीतांना आर्थिक सहाय्य मिळण्याकरिता होत असलेल्या विलंबाबाबत**

**(९) १०६३२८ (०४-०४-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ॲसिड हल्ला, बलात्कार पिडीतांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी शासनाच्या "मनोधैर्य योजना" अंतर्गत मदत मिळण्यासाठी शासनाकडे किती प्रकरणे मंजूरीसाठी प्रलंबित आहेत,
(२) असल्यास, याप्रकरणातील पिडीतांना आर्थिक मदत मिळावी यासाठी प्रलंबित प्रकरणांवर निर्णय होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या विलंबामुळे मा.मुंबई उच्च न्यायालयानेही राज्य शासनाला या योजनेतील तांत्रिक अडचणी तात्काळ दूर करुन पिडीतत महिलांना आर्थिक मदत देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही सुरु करावी अन्यथा या पिडीतांना महिला व बालविकास खात्याच्या प्रधान सचिवांच्या वेतनातून पैसे वळते करण्यात येतील असाही इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ॲसिड हल्ला व बलात्कार पिडितांना आर्थिक नुकसान भरपाई देण्याच्या प्रकरणी किती दिवसात कार्यवाही करण्यात येईत वा याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०५-२०१९) :** (१) राज्यातील ॲसिड हल्ला, बलात्कार पीडितांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी मनोधैर्य योजनेंतर्गत मदत मिळण्यासाठीची ११४२ प्रकरणे मंजुरीसाठी प्रलंबित आहेत.

(२) प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे विहित कालावधीत प्राप्त होण्यास विलंब लागतो.

(३) नाही.

(४) दि. ३०.१२.२०१७ च्या शासन निर्णयानुसार या योजनेंतर्गत पीडितांना अर्थसहाय्य देण्याचे अधिकार महाराष्ट्र राज्य विधी व सेवा प्राधिकरण यांचेकडे सोपविण्यात आलेले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधीकरण यांचेकडून कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर पीडितांना अर्थसहाय्य अदा करण्यात येते.

---

**मौजे कानूर बु. (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील पशुवैदयकीय दवाखान्याच्या इमारतीची दुरुस्ती करणेची मागणी**

**(१०) १०७२२७ (०१-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कानूर बु. (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील पशुवैदयकीय दवाखान्याच्या इमारतीची दुरुस्ती करण्याची मागणीचे लेखी निवेदन मा.पशुसंवर्धन मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती मौजे कानूर बु. येथील पशुवैदयकीय दवाखान्याच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) मौजे कानूर बु.ता.चंदगड, जि.कोल्हापूर येथे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ ची नविन इमारत बांधकामासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद, कोल्हापूरमार्फत मुलभूत सुविधा अंतर्गत सन २००५-०६ या वर्षामध्ये रू.३.५६ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला होता व सन २०१३-१४ मध्ये रू.४.१८ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला असून सदरचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

तसेच सन २०१८-१९ मध्ये जिल्हा परिषद कोल्हापूर अंतर्गत स्वनिधीमधील पशुवैद्यकीय दवाखाने/निवासस्थाने दुरूस्ती, विद्युतीकरण करणे या योजने अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ कानूर बु.ता.चंदगड, जि.कोल्हापूर येथील दवाखाना इमारतीची गळती काढणे, दारे खिडक्या दुरूस्ती व इतर किरकोळ दुरुस्ती यासाठी रू.२.९९ लक्ष निधी वितरीत केला असून सदरचे काम दिनांक १३.१०.२०१८ रोजी पूर्ण झाले आहे.

---

**अंबरनाथ नगरपरिषद (जि.ठाणे) हद्दीतील गावे नगर भूमापन क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत**

**(११) १०९४३३ (२७-०३-२०१८). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील गावे नगर भूमापन क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबतचे निवेदन अंबरनाथ येथील लोकप्रतिनिधींनी प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्याकडे दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व या प्रकरणी किती कालावधीत कार्यवाही होणे अपेक्षित आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) लोकप्रतिनीधिनी दिलेल्या पत्राबाबत मा.राज्यमंत्री, (नगरविकास, विधी व न्याय व संसदीय कार्य) यांच्याकडे बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकित उप अधीक्षक, भूमि अभिलेख, अंबरनाथ यांना लोकप्रतिनिधींच्या पत्रामध्ये उपस्थित केलेल्या मुद्याबाबत सविस्तर अहवाल तहसिलदार, अंबरनाथ यांचे मार्फत अंबरनाथ नगरपरिषदेस सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. सदर सुचनेच्या अनुषंगाने उप अधीक्षक, भूमि अभिलेख, अंबरनाथ यांनी दिनांक २२.१२.२०१७ रोजी तहसिलदार, अंबरनाथ यांचेकडे अहवाल सादर केला आहे. नगरपरिषद हद्दीमधील गावांचा गावठाण व पाडे भाग मंजूर विकास आराखड्याच्या नकाशावर दर्शविण्यात आलेला नाही. या सुधारणेसाठी नगरपरिषदेने मान्यतेचा ठराव पारित करुन एम.एम.आर.डी.ए. कडे सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई इत्यादी शहरांत अवैध प्रवासी वाहतूक होत असल्याबाबत**

**(१२) ११६८९० (२३-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे, नवी मुंबई, वसई इत्यादी शहरांत अवैध प्रवासी वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याचे माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे क्षेत्रामध्ये सर्वाधिक अवैध वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले असुन प्रामुख्याने रिक्षा, टॅक्सी यासह खाजगी बस आणि अन्य वाहनांचा समावेश आहे तसेच अवैध वाहतुकीमुळे शासकीय परिवहन उपक्रमाच्या महसुलाचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध वाहतुकीवर निर्बंध आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०५-२०१९) : (**१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालयांच्या वायूवेग पथकांमार्फत नियमितपणे अवैध प्रवासी वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येते. मुंबई (मध्य/पश्चिम/पूर्व), ठाणे, प्रादेशिक परिवहन कार्यालये व नवी मुंबई, वसई या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत माहे एप्रिल २०१७ ते ऑगस्ट २०१८ या कालावधीत ७५९३८ वाहने तपासण्यात आली असता ७७३८ वाहने दोषी आढळून आलेली असून त्यांच्याकडून रु.७२९.७२ लाख इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सायंगाव व पाटोदा (ता.येवला, जि.नाशिक) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतींना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**(१३) ११७७५४ (३१-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सायगाव, पाटोदा (ता.येवला जि.नाशिक) येथील इमारतींचा सन २०१८-१९ च्या कृती आराखड्यात समावेश करण्याबाबत तसेच इमारतींसाठी जिल्हा परिषदेकडून निधी उपलब्ध करून बांधकाम करण्यात येईल असे मा. पशुसंवर्धन मंत्री यांनी दिनांक १५ मार्च २०१८ रोजी वा त्यासुमारास आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारती निकामी झाल्यामुळे नवीन इमारती बांधण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पशुसंवर्धन मंत्री व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांना निवेदने दिली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारतींना प्रशासकीय मान्यता देण्यासह निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मौजे सायंगाव व पाटोदा, ता.येवला, जि.नाशिक येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या इमारती निर्लेखनाच्या प्रस्तावास दिनांक २९.६.२०१६ रोजीच्या जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार सन २०१८-१९ च्या कृती आराखडयात उपरोक्त इमारतीच्या बांधकामाचा समावेश प्राधान्याने करून, दिनांक २०.८.२०१८ रोजीच्या पत्रान्वये निधीची मागणी करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील निराधार, विधवा तसेच परित्यक्त्या महिलांच्या मुलींच्या नोंदणीकृत विवाहासाठी दिले जाणारे अनुदान वाढविण्याबाबत

**(१४) ११७७९१ (२३-०७-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निराधार, विधवा तसेच परित्यक्त्या महिलांच्या मुलींच्या नोंदणीकृत विवाहासाठी १० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मध्य प्रदेश, तेलंगणा आदी राज्यांमध्ये यासाठी ४० ते ५० हजार अनुदान दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्रात दिले जाणारे १० हजाराचे अनुदान अत्यंत तुटपुंजे असल्याने, सदर अनुदानात वरील राज्यांप्रमाणे वाढ करण्यात यावी, अशी मागणी विविध स्तरातून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०५-२०१९) :** (१) होय. या विभागांतर्गत शुभमंगल सामुहिक/नोंदणीकृत विवाह योजनेंतर्गत रु.१०,००० इतके अनुदान देण्यात येते.

(२) मध्यप्रदेश राज्यामध्ये यासाठी रुपये २२,०००/- तर तेलंगणामध्ये रु.१,००,११६/- इतके अनुदान देण्यात येते.

(३) होय.

(४) आयुक्तालयाकडून प्राप्त प्रस्तावाचा आढावा घेऊन सुधारित प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनाची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(१५) ११८३५० (२४-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिला सक्षमीकरणासाठी शासनाद्‌वारे विविध कल्याणकारी योजना आखण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजना राबविण्यासाठी लागणारे आवश्यक मनुष्यबळाचा अभाव व शासनाचे उदासिन धोरण यामुळे या योजनांची अंमलबजावणी योग्य रित्या झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनांची अंमलबजावणी त्वरित करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०५-२०१९) :** (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर अंतर्गत असलेल्या बफर झोनमधील वनपरिक्षेत्रांतर्गत गावांमध्ये डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना राबविण्यात येत असल्याबाबत**

**(१६) १२१७६५ (२६-०७-२०१८). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर अंतर्गत असलेल्या बफर झोनमधील वनपरिक्षेत्रांतर्गत आदिवासी बहुल गावांमध्ये डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेमध्ये रामटेक विधानसभा क्षेत्रातील किती गावांचा समावेश करण्यात आला आहे,
(३) असल्यास, या योजनेची अंमलबजावणी कशा प्रकारे करण्यात येत आहे,
(४) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-०४-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेअंतर्गत रामटेक विधान सभाक्षेत्रामधील पेंच व्याघ्र प्रकल्पातील १८ गावांचा समावेश करण्यात आला आहे.
(३) व (४) डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात येते :-
* व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावे, राष्ट्रीय उद्यान/अभयारण्याचे सीमेपासून २ कि.मी. आत येणाऱ्या गावांमध्ये सदर योजना राबविण्यात येते.
* उक्त योजनेअंतर्गत प्राप्त होणारा निधी राष्ट्रीयीकृत बँकेच्या संयुक्त बचत खात्यात जमा करण्यात येतो. सदर खात्यातील निधी गावाच्या विकासांचे कामे करण्याकरीता वापरण्यात येतो.
*सदर योजने अंतर्गत गावनिहाय सुक्ष्म आराखडा तयार करण्यात येतो व त्यानुसार वन्यजीव संरक्षण व संवर्धन संसाधनाचा विकास करणे, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करणे, पर्यायी रोजगाराची संधी वाढविणे, स्वच्छता अभियान राबविणे, पशु संसाधनांचा विकास करणे, जल संसाधनांचा विकास करणे इत्यादी कामे करण्यात येतात. डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेअंतर्गत रामटेक विधान सभा क्षेत्रामधील पेंच व्याघ्र प्रकल्पातील समाविष्ठ गावांमध्ये सुक्ष्म आराखडा तयार करणे व त्यानुसार कामे सुरु आहे.

---

### गडचिरोली जिल्हयातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(१७) १२२१०७ (२४-०७-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयातील पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांची ८१ पदे रिक्त असल्यामुळे उपचाराअभावी जनावरांचा मृत्यू झाल्याने पशुधनपालक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-०६-२०१९) :** (१), (२) व (३) गडचिरोली जिल्हयातील पशुसंवर्धन विभागाकरीता गट अ ते क मधील एकूण २५० पदे मंजूर असून त्यापैकी १६१ पदे भरली आहेत. ८९ पदे रिक्त आहेत. रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

सद्यस्थितीत पदांचे अतिरिक्त कार्यभार जवळच्या पशुवैद्यकीय अधिकारी/कर्मचारी यांचेकडे सोपविण्यात आलेले आहेत.

कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून शेतकऱ्यांना पशुरुग्णसेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. तसेच वेळोवेळी पशुधनास रोगप्रतिबंधक लसीकरण करण्यात येत आहे.

---

## भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील आंबी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची झालेली दुरवस्था

**(१८) १२२२३४ (३१-०७-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूम (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील आंबी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरवस्था झाल्याने पावसाळयात इमारतीतून पाणी गळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालय इमारतीची दुरवस्था झाल्याने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागतो तसेच पशु औषधांचा तुटवडा असल्याने पशू मालकांना खाजगी औषध दुकानांमधून औषधे खरेदी करावी लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारतीच्या दुरवास्थेसह पशु औषधांच्या तुटवडयाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-०६-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर इमारतीची दुरावस्था झाल्यामुळे पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी नवीन इमारत बांधण्याचा निर्णय घेण्यात आला असून यासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रू.३५.०० लक्ष एवढ्या खर्चाचे अंदापत्रक मंजूर करण्यात आले आहे.

तसेच या पशुवैद्यकीय दवाखान्यासाठी पुरेशा औषधांचा पुरवठा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इगतपूरी तालुक्यातील भावली धरणाचे पाणी शहापूरला वळविण्याचा घेतलेला निर्णय

**(१९) १२२८९१ (२४-०७-२०१८). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयातील वैजापूर आणि गंगापूर या ठिकाणी पाणी पुरवण्याचे महत्वाचे स्त्रोत असणा-या इगतपूरी तालुक्यातील भावली धरणाचे पाणी शहापूरला वळविण्याचा निर्णय मंत्रीमंडळ उपसमितीने माहे मे,२०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाडयातील पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत काढून तो ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील ९७ टँकरग्रस्त गावांना प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेद्वारे देण्याचा प्रयत्न केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या या निर्णयाला विरोध असल्याने सदर निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०४-२०१९) :** (१) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र.बिसिंआ २०१६/(५२८/१६) दि. २३/०३/२०१८ अन्वये भावली धरणातून ठाणे जिल्ह्यातील ९७ गावांच्या पाणी पुरवठा योजनेसाठी १२.६९ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित करण्यात आले आहे.
(२) नाही.
(३) हा निर्णय सक्षम स्तरावर व्यापक जनहितास्तव घेण्यात आला आहे त्यामुळे फेरविचार करण्याची आवश्यकता नाही. तसेच याबाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण येथे याचिका क्र. ५/२०१८ वर सुनावणी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे ओरोस बुद्रुक (जि.सिंधुदुर्ग) येथील शिवाजी लॉ कॉलेजच्या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत

**(२०) १२३७२२ (२०-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे ओरोस बुद्रुक (जि.सिंधुदुर्ग) येथील शिवाजी लॉ कॉलेजच्या अनधिकृत बांधकामांचे संरक्षण करणा-या श्री. मंगेश यादव यांचे शासकीय सेवेतून तात्काळ निलंबन करण्याबाबतची तक्रार कस्तुरीमृग फाऊंडेशनचे अध्यक्ष यांनी दिनांक २६ सप्टेंबर २०१७ रोजी जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचेकडे व दिनांक २९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा. महसूल मंत्री, मा.महसूल राज्य मंत्री व प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ३० ऑक्टोबर, २०१७ रोजी तहसीलदार, कुडाळ यांनी मंडळ अधिकारी, कसाल यांना अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असून दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ व १२ मार्च, २०१८ रोजी अहवाल सादर करण्याबाबत कळविले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अहवाल सादर करण्याचे आदेश दिल्यानंतरही मंडळ अधिकारी, कसाल यांनी अद्यापपर्यंत याबाबतचा अहवाल सादर केला नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करून उक्त मंडळ अधिकारी व शिवाजी लॉ कॉलेजच्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०५-२०१९) :** (१) कस्तुरीमृग फाऊंडेशनचे अध्यक्ष यांनी याबाबतचे निवेदन दि.२६.०९.२०१७ रोजी जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांना आणि त्यांचे अन्य निवेदन स्थानिक लोकप्रतिनिशी यांनी मुख्य सचिव यांचेकडे दि.२९.०५.२०१८ रोजी सादर केले आहे.
(२) होय
(३) मंडळ अधिकारी, कसाल यांनी दि.२५.०६.२०१८ च्या पत्राव्दारे तहसिलदार, कुडाळ यांस अहवाल सादर केलेला आहे.
(४) दिवाणी न्यायालय, सिंधुदूर्ग मध्ये दाखल रे.दि.मुकदमा क्र.२६/२००९ मध्ये न्यायालयाने दि.२५.०४.२०११ रोजी दिलेला निकाल व सदर निकालाविरोधत जिल्हा न्यायालय, सिंधुदूर्ग येथे दाखल करण्यात आलेल्या दावा क्र.३५/२०१२ मध्ये मा. न्यायालयाने दि.३०/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशामुळे शिवाजी लॉ कॉलजेचे बांधकाम काढून टाकणेबाबत कार्यवाही करणे उचित होणार नाही, असे मत असल्याचे जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांनी कळविलेले आहे. सबब, सदर प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सांगली व कोल्हापूर जिल्हयातील प्रत्येक ग्रामीण व्यक्तीला प्रॉपर्टी कार्ड देण्याबाबत

**(२१) १२५२६४ (२३-०७-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली व कोल्हापूर जिल्हयातील प्रत्येक ग्रामीण व्यक्तीला प्रॉपर्टी कार्ड देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून जिल्हयातील अनेक गावे ही विकसित झाली असल्याने व अनेक नागरिकांचे प्रॉपर्टी कार्ड बनले नसल्याने या ठिकाणी राहत असलेल्या नागरिकांना दुहेरी कराचा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूर येथील अनेक लोकप्रतिनिधीकडून याबाबत सातत्याने पाठपुरावा करून देखील जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडून परिपूर्ण प्रस्ताव महसूल विभागास सादर करण्यास विलंब लावण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून नागरिकांना सहन करावा लागत असलेला दुहेरी कराचा त्रास कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१९) :** (१), (२) व (३) सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामीण व्यक्तीला प्रॉपर्टी कार्ड देणेबाबतचा शासनाने निर्णय घेतलेला नाही. परंतु ग्राम विकास विभागाने दिनांक २२.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व गावांच्या गावठाणांचा जमाबंदी प्रकल्प राबविण्यास मान्यता दिली आहे.

सांगली जिल्ह्यातील २२८ गावांचे व कोल्हापूर जिल्ह्यातील ३३० गावांचे नगर भूमापन काम पूर्ण झाले असून त्यांचे अभिलेख संबंधीत कार्यालयात उपलब्ध आहेत. सदर गावातील मिळकत धारकांना प्रॉपर्टी कार्डचे प्रमाणित उतारे त्यांचे मागणीप्रमाणे पुरविणेत येत आहेत.

स्थानिक मालमत्ता कर हा स्थानिक स्वराज्य संस्थेकडील कायद्यानुसार स्वतंत्रपणे वसूल केला जातो.

प्रॉपर्टी कार्डच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील लोकप्रतिनीधी यांचेकडून जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्गनगरी (जि.सिंधुदुर्ग) येथे मे.ओट्रा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीने अनधिकृतरित्या नाला बुझविल्याबाबत

**(२२) १२५३८१ (२०-०७-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्गनगरी (जि.सिंधुदुर्ग) येथे मे.ओट्रा इन्फ्रास्ट्रकचर प्रा.लि कंपनीने परवानगी न घेता नाला बुजविल्याबाबतची तक्रार कस्तुरीमृग फाउंडेशनचे अध्यक्ष यांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मा.महसूल राज्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने अहवाल तयार करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांना दिले असून त्यांनी अद्यापि अहवाल न दिल्याने शासन स्तरावरुनही याबाबत आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानंतरही उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी अहवाल न दिल्याने त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची तक्रार प्रधान सचिव, महसूल विभाग यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अहवाल अद्यापि सदर न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, या प्रकरणी अहवाल सादर करण्यास टाळाटाळ करणा-या उपविभागीय अधिकारी व अनधिकृतरीत्या नाला बुझविणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०४-२०१९) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) सिंधुदुर्गनगरी नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रामधील भूखंड क्र.८२/१ क्षेत्र ९३८२ चौ.मी. हा ओट्रा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिनांक २५.०६.२०१५ च्या आदेशान्वये ९९ वर्षांच्या भाडे करार तत्वाने मंजूर केला असून सदर भूखंडास दिनांक १३.०५.२०१६ च्या पत्रान्वये बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. सदर कंपनीने परवानगी न घेता नाला बुजविल्याबाबत कस्तुरीमृग फाऊंडेशन चे संस्थापक यांनी मा.महसूल राज्यमंत्री यांचेकडे दिनांक २६.०३.२०१८ च्या पत्रान्वये तक्रार दाखल केली आहे.

सदर जागेची उपविभागीय अधिकारी, कुडाळ यांनी भूमी अभिलेख व अधिक्षक अभियंता दक्षिण कोंकण पाटबंधारे, प्रकल्प मंडळ, सिंधुदुर्गनगरी यांचे प्रतिनिधीसोबत दिनांक ०७.०१.२०१९ रोजी समक्ष पाहणी केली असून ओट्रा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि यांना मंजूर केलेला भूखंड व नाला यामधील अंतर निश्चित करणे कामी भूमी अभिलेख विभागाकडून मोजणी करणेबाबत कार्यवाही सुरु असून मोजणी अंती सदर नाला उक्त कंपनी यांचे कार्यक्षेत्रात येतो किंवा कसे याबाबत खात्री करुन उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**चेंबूर येथील आर.सी. मार्गावर चेंबूर कॅम्प- वाशीनाका दरम्यानच्या**
**बस थांब्यावर अवैधरित्या रिक्षा उभ्या असल्याबाबत**

**(२३) १२६५८५ (११-१२-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबूर येथील आर.सी. मार्गावर चेंबूर कॅम्प- वाशीनाका दरम्यानच्या बस थांब्यास अवैधरित्या रिक्षा स्टँड बनविल्यामुळे विद्यार्थ्यांसह प्रवाशांना त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रिक्षाचालकांच्या मनमानीमुळे त्यांस विरोध करणा-या नागरिकांना अनेक वेळा मारहाण होण्याचे प्रकारही घडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध रिक्षा स्टँडबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०५-२०१९) :** (१) अशा आशयाची बातमी दि.०६.०८.२०१८ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे.
(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पूर्व) यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, (वाहतूक विभाग) आर.सी.मार्ग, चेंबूर कॅम्प यांना अवैधरित्या उभ्या असणाऱ्या रिक्षांबाबत कारवाई करण्याबाबत कळविले आहे. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत सदर स्टॅण्डवर अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या रिक्षांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सदर ठिकाणी वाहतूक पोलीसांमार्फत माहे ऑगस्ट, २०१८ पासून आजपर्यंत एकूण ५१९ ऑटोरिक्षा चालकांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) या कार्यालयाच्या वायूवेग पथकामार्फत एकुण १० ऑटोरिक्षांविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिरे वैद्यकीय महाविद्यालय (जि.धुळे) रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२४) १२६८०७ (१०-१२-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिरे वैद्यकीय महाविद्यालय (जि.धूळे) रुग्णालयातील रुग्णांच्या संरक्षणासाठी कर्मचारी नसल्याने श्री.सुकाराम भील यांच्याकडून स्ट्रेचरवरुन वैद्यकीय साहित्य नेण्याचे काम करुन घेतले असल्याचे तसेच रुग्णालयातील इतर गैरकारभार देखील माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिरे वैद्यकीय महाविद्यालयात चतुर्थश्रेणी कर्मचा-यांची ५५ पदे रिक्त असल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयातील रिक्त पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०५-२०१९) :** (१) व (२) श्री.भाऊसाहे हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धुळे या संस्थेत श्री. सुकाराम भील यांनी स्ट्रेचरवरुन वैद्यकीय साहित्य नेण्याचे काम त्यांच्या नातेवाईकांना मदत करण्याच्या दृष्टीने केले होते. तसेच सदर संस्थेत रुग्णालयीन गैरकारभाराची कोणतीही बाब निदर्शनात आली नाही.

सदर संस्थेत २२७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १६८ पदे भरलेली असून ५९ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ संवर्गामधून वर्ग-३ संवर्गात कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या पदोन्नत्या दिलेल्या असल्यामुळे वर्ग-४ संवर्गातील रिक्त पदांमध्ये वाढ झालेली आहे.

(३) वर्ग-४ ची पदे भरतीवर शासनाने निर्बंध घातलेले आहे. परंतु वित्त विभाग दि.२७.९.२०१० अन्वये वर्ग-४ व सफाईदाराची कामे बाहयस्त्रोतामार्फत करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या असल्याने सदर पदे बाहयस्त्रोतामार्फत भरण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार व अनुकंपा तत्वानुसार वर्ग-४ ची पदे संस्थास्तरावर भरण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्कूल बसमधील १२ आसनांपर्यंतच्या वाहनांना परवानगी दिल्याबाबत**

**(२५) १२६९८४ (१५-१२-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्कूल बसच्या नियमांत बदल करुन रिक्षा आणि १२ पेक्षा कमी आसनाच्या गाडयांमधून शालेय विद्यार्थ्यांना नेण्याची परवानगी राज्य सरकारने दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमी आसनी वाहनांना परवानगी दिल्याने विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात येत असल्याने नियमांत बदल करुन अशाप्रकारे १२ पेक्षा कमी व रिक्षांना शालेय बस म्हणून परवानगी देण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, पीटीए युनायटेड फोरमने स्कूल बस सुरक्षेच्या नियमामध्ये बसत नसल्याने याचिका दाखल केली असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शालेय विदयार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिने स्कूल बसबाबतच्या नियमावलीचे पालन करण्याबाबत शासनाने कार्यवाही करुन नियमांचे उल्लंघन करणा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०५-२०१९) :** (१) राज्य शासनाने स्कुल बस बाबत नियम विहीत केलेले आहेत. सदर नियमानुसार १२ पर्यंत आसन क्षमता असलेल्या वाहनांचा तसेच टणक छताच्या बंदिस्त प्रवासी कक्षांनीयुक्त ऑटोरिक्षाचा समावेश स्कूलबस मध्ये करण्यात आलेले आहे.

(२) राज्यातील छोटी शहरे, ग्रामिण भाग, तसेच मोठया शहरांतील गल्ली बोळातील रस्ते अशा ठिकाणी मोठया प्रकारच्या वाहनांना (बस) शालेय मुलांची वाहतूक करण्यास अडचणीचे होत असल्याने प्रत्येक शाळेला शहरातील सर्वच रस्त्यावरून बस सेवा पुरविणे शक्य नसल्याने अशा मार्गावरील विद्यार्थ्यांना अन्य छोटया वाहनांनी प्रवास करणे सोयीस्कर ठरते. तसेच छोटया शहरात व ग्रामिण भागात व्हॅन/ऑटोरिक्षा यासारखी लहान वाहने वाहतूकीस उपलब्ध होतात. तथापि, प्रत्यक्षात अद्यापपर्यंत परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी टणक छताच्या रिक्षास स्कूल बस म्हणून मान्यता दिलेली नाही.

(३) होय. सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.
(४) शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल बसेस व इतर खाजगी वाहनांची नियमितपणे तपासणी करण्यात येते. माहे एप्रिल, २०१८ ते माहे डिसेंबर, २०१८ या कालावधीत २६९४० वाहनांची तपासणी करण्यात आली असून ५३३२ वाहने दोषी आढळून आलेली आहे. त्यापैकी ९७७ वाहने अटकावून ठेवण्यात आलेली आहे. सदर कारवाईतून रू.१.४७ लाख इतका महसूल शासनखाती जमा करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### धुळे जिल्हयातील ट्रकचालकांच्या मागण्यांबाबत

**(२६) १२७२३२ (३०-११-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे जिल्हयातील ट्रक चालकांनी विविध मागण्यांसाठी दिनांक २१ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास चक्का जाम आंदोलन सुरु केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ट्रकचालकांच्या मागण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.
अशा आशयाची बातमी दि.२२.०७.२०१८ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली आहे.
(२) देशभरातील ट्रक चालक संघटनांनी त्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दि.२०.०७.२०१८ पासून पुकारलेल्या आंदोलनासंदर्भात शासनाने दि.१९.०७.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये आवश्यक त्या स्थायी स्वरूपाच्या उपाययोजना करण्याकरीता विभागीय/क्षेत्रियस्तरावरील कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बोंडगाव व नागझरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील जमीन बनावट कागदपत्राआधारे विक्री केल्याबाबत

**(२७) १२७५०५ (३०-११-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.रुपेश**

**म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अमित घोडा (पालघर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोंडगाव व नागझरी (ता.डहाणू, जि.पालघर) येथील श्री.प्रमोद कर्णिक व कुटुंबीय यांची वडिलोपार्जित ६८ एकर जमीन बनावट कागदपत्रे व आधार कार्ड बनवून संबंधित व्यक्तींनी अधिकाऱ्यांच्या संगनमताने विक्री केल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हयातच कोटयवधी रुपयांची १०० एकर जमिन बनावट ओळखपत्रे व आधार कार्ड बनवून संबंधितानी शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने केवळ २३ लाख रुपयांना विकली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार वरील दोन्ही प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०४-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे बोंडगाव व नागझरी ता.डहाणू, जि.पालघर येथील कर्णिक कुटुंबियांच्या जमिनीच्या खरेदी-विक्रीबाबत जमिनीचे दुय्यम निबंधक, डहाणू यांचे कार्यालयात नोंदणीकृत दस्ताबाबत मौजे बोंडगाव येथील स.नं ३५८ व ३३५ (दस्त क्र. २८९/२०१८) स.नं ४२१, ४२५, ४३१, ४३० व १२ (दस्त क्र. २९०/२०१८) तसेच मौजे नागझरी येथील स.नं.१११, १६९, ३०, व ८५ (दस्त क्र. ४९८/२०१८) जमिनींच्या दस्ताबाबत जमीन मालकांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने बनावट कागदपत्रांचे आधारे खरेदी केल्याचे निष्पन्न झालेने डहाणू, पोलीस ठाणे येथे एफ.आय.आर. क्र.१८१/२०१८, दिनांक २२.११.२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच तालुका डहाणू जि. पालघर येथील तलाठी सजा गंजाड, मौजे गणेशबाग येथील सर्व्हे नंबर २३/८, २३/९ (दस्त क्र. १४४३/२०१७) व मौ. सोमनाथ येथील सर्व्हे नं. ११/२/१, १२/२/१, १२/३/१ (दस्त क्र. १४६६/२०१७) च्या जमिनीच्या दस्ताबाबत जमिनीच्या मालकांनी तक्रार दाखल केल्याने डहाणू पोलीस ठाणे यांचेकडे दिनांक २४.९.२०१८ रोजी गुन्हा दाखल (एफ.आय.आर. क्र. ०१४४/२०१८ व एफ.आय.आर. क्र. ०१४५/२०१८) करण्यात आलेला आहे. वरील सर्व गुन्हयांचे अनुषंगाने पोलीस अधीक्षक, पालघर यांचेकडे तपास सुरु आहे.

---

**वसई (जि.पालघर) तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदारांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२८) १२७५११ (३०-११-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला),**

**श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तहसिलदार कार्यालयात ५ नायब तहसिलदारांची पदे मंजूर असून त्यापैकी ३ नायब तहसिलदारांची पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे नागरीकांची कामे विहित मुदतीत पूर्ण होत नसल्यामुळे अनेक कामे प्रलंबित राहून नागरिकांची गैरसोय होत असल्याचे तसेच कार्यरत दोन नायब तहसिलदारांवर कामाचा अतिरिक्त भार येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन वसई तहसिल कार्यालयातील नायब तहसिलदारांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०३-२०१९) :** (१) तहसिल कार्यालय वसई, जि.पालघर येथे नायब तहसिलदार संवर्गाची ५ मंजूर पदांपैकी नायब तहसिलदार (संजय गांधी योजना) हे १ पद व्यपगत झाले असल्यामुळे ते भरता येत नाही. उर्वरीत ४ पदांपैकी २ पदे भरलेली आहेत.

(२), (३) व (४) तहसिल कार्यालय वसई, जि.पालघर येथील व्यपगत झालेले नायब तहसिलदार (संजय गांधी योजना) हे पद पुनर्जिवीत करणेबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास विनंती करण्यात आली आहे. राज्यातील विविध महसूल विभागातील नायब तहसिलदार संवर्गाच्या सरळसेवा कोटयातील रिक्त पदांच्या अनुषंगाने एकत्रित मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आले आहे. तसेच नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देऊन पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, कोकण यांचेस्तरावरून करण्यात येत आहे.

___________

**धामणगाव बढे (ता.मोताळा, जि.बुलढाणा) बस थांबासमोरील मुख्य रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(२९) १२७९३५ (१०-१२-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव बढे (ता.मोताळा, जि.बुलढाणा) बस थांबासमोरील मुख्य रस्त्याची दुरवस्था झाली असून अपघाताचे प्रमाण वाढले असल्याची बाब दिनांक १ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे दुतर्फीकरण, नाली बांधकामास खडीकरण व दुभाजकावर विद्युत एलईडी दिवे लावणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या मागणीनुसार सदर रस्त्याचे दुतर्फीकरण, नाली बांधकामास खडीकरण व दुभाजकावर विद्युत एलईडी दिवे लावणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०४-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याचे दुपदरीकरण व काँक्रिटीकरणाची मागणी केलेली आहे.

(३) व (४) याबाबत निधी, निकष व प्राधान्यक्रमाच्या अधिन राहुन कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**मोटार वाहन निरिक्षक या पदासाठी अपात्र ठरलेल्या उमेदवारांना राज्य शासनाच्या सेवेत समावून घेण्याबाबत**

**(३०) १२८१०३ (१०-१२-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोटार वाहन निरिक्षक या पदाकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दीड वर्षापूर्वी संबधित पदाची जाहिरात प्रसिध्द करुन परिक्षा देतांना पूर्वीची हेवी ड्रायव्हींग लायसन्स व २ वर्षाचे गॅरेजमधील अनुभवाचे प्रमाणपत्र आवश्यक ही अट नमूद असल्यामुळे परिक्षेत पात्र ठरलेल्या ८३४ उमेदवारांना अद्यापही राज्य शासनाच्या सेवेत समावून घेण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची चौकशी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदरहू पात्र उमेदवारांना शासनाच्या सेवेत समावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०५-२०१९) :** (१), (२), (३) व (४) शासनाने सहायक मोटार वाहन निरिक्षक संवर्गाचे सुधारित सेवाप्रवेश नियम दि.२३/११/२०१६ रोजी विहीत केलेले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमानुसार पात्र ठरलेल्या ८३२ उमेदवारांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शासनास केली आहे. तथापी, दरम्यानच्या काळात उक्त दि.२३/१२/२०१६ च्या सेवाप्रवेश नियमास मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्र.१२७०/२०१८ अन्वये आव्हान देण्यात आले. सदर याचिकेत मा.उच्च न्यायालयाने दि.२९/९/२०१८ च्या आदेशान्वये उक्त सेवाप्रवेश नियमातील नियम ३ (iii) (गॅरेज अनुभव प्रमाणपत्र) आणि ३ (iv) (आवश्यक अनुज्ञप्ती) मधील परंतुक व नियम ४ (परिविक्षाधीन कालावधी) रद्दबातल ठरवलेले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञप्ती याचिका दाखल करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणांमधील लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांनीही मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केलेली आहे. या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने जैसे थे (status quo) चे आदेश दिलेले आहेत. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**बुलढाणा जिल्हयातील नायब तहसलिदार संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३१) १२८३७६ (३०-११-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खुल्या प्रवर्गातील ७२ हजार व मागासवर्गीयांच्या ५० हजार रिक्त पदांचा अनुशेष असून केवळ बुलढाणा जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालयात निम्म्यापेक्षा अधिक नायब तहसलिदार संवर्गातील पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या रिक्त पदांमुळे बुलढाणा जिल्हयातील महसूल विभागातील अनेक कामे प्रलंबित झाली असून त्यामुळे नागरीकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून बुलढाणा जिल्हयातील महसूल विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०३-२०१९) :** (१) बुलढाणा जिल्हयामध्ये नायब तहसिलदार संवर्गाची एकूण ७० पदे मंजूर असून त्यापैकी माहे ऑगस्ट-२०१८ अखेर १० पदे रिक्त होती.तदनंतर विविध कारणांमुळे आणखी ४ पदे रिक्त झालेली आहेत.

(२), (३) व (४) प्रशासकीय कामकाज सुरळीत चालण्याच्या दृष्टीने रिक्त असलेल्या नायब तहसिलदार पदांचा पदभार अन्य नायब तहसिलदार संवर्गातील अधिका-यांकडे सोपविण्यात येऊन कामकाज पार पाडण्यात येत आहे.

राज्यातील विविध महसूल विभागातील नायब तहसिलदार संवर्गाच्या सरळसेवा कोटयातील रिक्त पदांच्या अनुषंगाने एकत्रित मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आले आहे. तसेच नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देऊन पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, अमरावती यांचे स्तरावर करण्यात येत आहे.

---

**घाटबोरी (जि.बुलढाणा) येथील पशुवैद्यकिय दवाखान्याच्या दुरुस्तीबाबत**

**(३२) १२८८४३ (१५-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटबोरी (जि.बुलढाणा) येथील पशुवैद्यकिय दवाखान्यांची दुरवस्था झाली असून सदर इमारत मोडकळीस आल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन घाटबोरी येथील पशुवैद्यकीय दवाखान्यांची दुरुस्ती वा नविन इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-०३-२०१९) :** (१) होय.

(२) मौजे घाटबोरी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ या दवाखान्याच्या इमारतीची दुरुस्ती जिल्हा परिषद, बुलढाणा यांच्या निधीमधून करण्यात येत असून यासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात रु.४.६७ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चांभरा तांडा व सोनाळा (ता.हदगांव,जि.नांदेड) येथील गायरान जमिनीचे पट्टे शेतकऱ्यांच्या नांवावर करण्याबाबत**

**(३३) १२८८७६ (३०-११-२०१८). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांभरा तांडा व सोनाळा (ता.हदगांव,जि.नांदेड) येथील ४० शेतकरी गत ३८ वर्षापासून गायरान जमिनीवर शेती करुन उदरनिर्वाह करत असून या गायरान जमिनीचे पट्टे नांवावर

करुन देण्याची त्यांनी मागणी केली असल्याचे व शासनाकडून याबाबत विलंब लावला जात असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासन निर्णय क्र.२८ नोव्हेंबर, १९९१ व शासन निर्णय २२ एप्रिल, १९९२ नुसार गायरान जमिनीवरील शेतीचे अतिक्रमणे नियमानुकुल करण्याबाबत कारवाई विशेष मोहिम काढून ६ महिन्यात अशी प्रकरणे कालबध्द रितीने निकाली काढण्याचे आदेश असतानाही महसुल विभागाकडून टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून चांभरा तांडा व सोनाळा येथील गायरान जमिनीवर शेती करणाऱ्यांच्या नावावर गायरान जमिनीचे पट्टे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०४-२०१९) :** (१), (२) व (३) चांभरा तांडा व सोनाळा, ता.हदगांव, जि.नांदेड येथील ६ शेतकऱ्यांचे गायरान जमीन नांवे करण्याबाबतचे अर्ज तहसिल कार्यालयास प्राप्त झाले आहेत. तहसिलदार हदगांव यांच्या अहवालानुसार प्रस्तुत प्रकरणी सदर अतिक्रमण धारकांचे गायरान जमिनीवर १९७० पूर्वीपासून अतिक्रमण असून अतिक्रमण धारकाच्या स्वत:च्या कुटूंबात जमीन असल्यामुळे तसेच गा.न.नं.७/१२ च्या वहिती पेऱ्यास नाव व प्रत्यक्ष वहिती असल्यामुळे अतिक्रमण नियमित झालेले नाही.

तसेच, अर्जदारांच्या २०१८ मधील अर्जानुसार त्यांनी सन १९९० पूर्वीचे सबळ महसूली कागदोपत्री पूरावे दाखल न केल्यामुळे त्यांचे अर्ज निकाली काढले असल्याचे संबंधितांना दि.०१.११.२०१८ रोजीच्या पत्रान्वये तहसिलदार, हदगांव यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### लातूर ते पानगांव (ता.रेणापूर,जि.लातूर) येथील जीपद्वारे अवैध वाहतूक असल्याबाबत

**(३४) १२८९०० (११-१२-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर ते पानगांव (ता.रेणापूर, जि.लातूर) येथे जीपद्वारे अवैध वाहतूक मोठया प्रमाणात सुरु असून (जीप क्र. एम.एच.२४/३४८९) या संदर्भात स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व प्रादेशिक परिवहन अधिकारी, लातूर यांच्याकडे दिनांक २५ ते २७ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०५-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर यांच्या अधिनस्त वायुवेग पथकाव्दारे अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नियमितपणे कारवाई करण्यात येते. अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात सन २०१४ ते सन ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत केलेल्या तपासणीत ५४४९ वाहने दोषी आढळून आलेली आहे. त्यापैकी २५८२ वाहनांची नोंदणी व ८३१ वाहनांचा परवाने निलंबित करण्यात आलेले आहे. सदर कारवाईतून रू.२१५.३३ लाख इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुरगुड (जि.कोल्हापूर) शहराचा सिटी सर्व्हे करण्याबाबत

**(३५) १२८९९६ (३०-११-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरगुड (जि.कोल्हापूर) शहरात सन १९७२-७३ नंतर सिटी सर्व्हे झालेला नसल्यामुळे हद्दीच्या कारणावरुन अनेक वाद निर्माण झाले असून मिळकतीच्या नोंदी नसल्यामुळे प्रापर्टी कार्ड मिळत नसल्याने तातडीने शहराचा सिटी सर्वे करण्याबाबत निवेदन मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यासार मुरगुड शहराचा सिटी सर्व्हे तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१९) :** (१), (२) व (३) मोजे मुरगुड, ता. कागल, जि. कोल्हापूर या गावाला नगर भूमापन योजना लागू झाली असून सदर गावचे नगर भूमापन काम सन १९७४ मध्ये पूर्ण झाले असून त्याच्या एकूण मिळकती २४६५ आहेत व त्यांचे अभिलेख संबधित कार्यालयात उपलब्ध आहेत. सदर गावातील मिळकत धारकांना प्रापॅर्टीकार्डाचे प्रमाणित उतारे मागणीप्रमाणे पुरविणेत येत आहेत. तथापि, मा.मंत्री (महसूल) यांचेकडून मुरगुड शहराचे तातडीने सिटीसर्व्हे करणेचे निवेदन अथवा त्याबाबत कोणत्याही प्रकारचे पत्र माहे ऑगस्ट, २०१८ अखेर अथवा त्यानंतर जमाबंदी आयुक्त, पुणे, उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे व जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर अथवा उप अधीक्षक, भूमि अभिलेख, कागल यांचेकडे प्राप्त झालेले नाहीत.

सध्यस्थितीत, मुरगुड येथील विस्तारीत वाढीव गावठाणाचे नगर भूमापन करणेचे असल्यास सदर कामासाठी येणाऱ्या खर्चाचे हमीपत्रासह रितसर प्रस्ताव नगरपरिषद मुरगुड यांचेकडून प्राप्त होणे आवश्यक आहे. परंतु नगरपरिषदेकडून अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी कोर्ट मॅरेज ही सुविधा सुरु करण्याबाबत

**(३६) १२९३२९ (३०-११-२०१८). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रजिस्टर मॅरेज किंवा कोर्ट मॅरेज व सिव्हील मॅरेज केवळ जिल्हयाच्या ठिकाणी होत असल्याने ते प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी होण्यासाठी श्री.रघुनंदन श्रीराम शर्मा, जळगांव यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ४ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०४-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) विशेष विवाह कायद्यातंर्गत मागील दोन वर्षामध्ये संपन्न झालेल्या विवाहांची माहिती घेतली असता, पुणे, ठाणे व मुंबई वगळता उर्वरित जिल्हयामध्ये उक्त कायद्यांतर्गत संपन्न झालेल्या विवाहांची आकडेवारी फारच नगण्य आहे. त्यामुळे या प्रयोजनार्थ तालुका स्तरावर स्वतंत्र कार्यालय निर्माण करण्याइतपत परिस्थिती दिसून येत नाही.

---

### पालघर जिल्ह्यातील महसूल विभागाच्या अनुकंपा उमेदवारांची यादी तयार करण्याबाबत

**(३७) १२९४९८ (३०-११-२०१८). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयाची स्थापना होऊन चार वर्षे झाली असतानाही महसूल विभागातील अनुकंपा उमेदवाराची प्रतिक्षा यादी निश्चित करण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय तसेच महसूल विभागातील अनुकंपा उमेदवारांची प्रतीक्षा यादी तयार न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, चौकशीनुसार पालघर जिल्ह्यातील महसूल विभागाच्या अनुकंपा उमेदवारांची यादी तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०५-२०१९) :** (१), (२) व (३) पालघर जिल्ह्याच्या निर्मितीपूर्वी ठाणे जिल्ह्यातील मुळ सामायिक प्रतिक्षासूची यादीतील उमेदवारांना नियुक्ती देणे किंवा सामायिक प्रतिक्षासूचीतील दोन्ही (ठाणे/पालघर) जिल्ह्यातील अनुकंपा यादीचे विभाजन करण्याचे

धोरणात्मक निकष ठरविण्यासंदर्भातील विभागीय आयुक्त, कोकण यांनी दि.२९.९.२०१७ च्या पत्राव्दारे केलेल्या विचारणेच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२३.०१.२०१८ च्या पत्रान्वये ठाणे जिल्हयातील दि.३१.०७.२०१४ पूर्वीच्या सामायिक प्रतिक्षासुची यादीतील प्रकरणांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांस निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि.२९.१०.२०१८ च्या ज्ञापनान्वये पुर्वश्रमीच्या ठाणे जिल्ह्याच्या (ठाणे व पालघर मिळुन) अनुकंपा उमेदवारांच्या प्रतिक्षासुचीमधुन केवळ नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेल्या अनुकंपा उमेदवारांची नवनिर्मित ठाणे व पालघर जिल्ह्यांची विभाजनाची यादी तयार करुन ती www.thane.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे. तसेच सदर याद्यांवर काही हरकती असल्यास १ महिन्याच्या आत जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयात संबंधित कागदपत्रांसह उपलब्ध करुन देण्याबाबतही कळविण्यात आले आहे. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दि.२९.१०.२०१८ चे ज्ञापन जिल्हाधिकारी, पालघर यांनी दि.१२.११.२०१८ च्या पत्रान्वये पालघर जिल्ह्यातील सर्व संबंधित कार्यालयांच्या निदर्शनास आणुन त्याबाबतच्या हरकती असल्यास त्या जिल्हाधिकारी, ठाणे यांस उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून पालघर जिल्ह्याची अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबतची अंतिम सामायिक प्रतिक्षासूची यादी उपलब्ध करुन दिल्यानंतर नियमानूसार अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, पालघर यांचेमार्फत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सव्वा लाख परवाने व्ही आय पी कोटयातुन देण्यात आल्याबाबत**

**(३८) १२९६६२ (११-१२-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे जुन २०१७ ते जुलै २०१८ या कालावधीत सव्वा लाख परवाने व्ही आय पी कोटयातुन देण्यात आले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वाधिक परवाने नागपूर जिल्हयात देण्यात आले असुन जनतेच्या तक्रारीनंतर एका सहायक मोटार निरीक्षकास निलंबित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परवाने व्ही आय पी कोटयातून दिल्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०५-२०१९) :** (१) १ जुन २०१७ ते ३१ जुलै २०१८ या कालावधीत राज्यात एकुण १८,९४,१२४ अर्जदारांना चाचणी घेऊन शिकाऊ अनुज्ञप्ती जारी करण्यात आली असून त्यापैकी पीकअप कॅन्डीडेट (व्हीआयपी कोटा) या पर्यायाचा वापर करुन एकुण १,७०,८४८ अर्जदारांची शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणी घेण्यात आली आहे.

(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर) या कार्यालयात माहे जानेवारी २०१८ मध्ये ४८९७ उमेदवारांसाठी पीकअप कॅन्डीडेट (व्हीआयपी कोटा) या पर्यायाचा वापर करुन गैरव्यवहार केल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास आल्याने सदर ठिकाणी कार्यरत सहायक मोटार वाहन निरीक्षक यांना दि.०६.०७.२०१८ रोजी निलंबित करण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरणांची सखोल चौकशी करण्याकरिता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी गोंदीया व राष्ट्रीय सूचना केंद्र यांच्या प्रतिनिधीची समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणाची स्थानिक सायबर क्राईम विभागामार्फत स्वतंत्रपणे चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणाच्या अनुषंगाने श्री. तिवारी यांनी मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे जनहित याचिका क्र.९६/२०१८ दाखल केली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

पीकअप कॅन्डीडेट (व्हीआयपी कोटा) या पर्यायाचा वापर अपवादात्मक परिस्थितीमध्ये व संबंधित कार्यालयातील सहायक प्रादेशिक परिवहन किंवा त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्याबाबतच्या सूचना परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि.३०.०६.२०१८ रोजीच्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हातील सहकारी गृह निर्माण संस्थाना निवासी उपयोगासाठी वाटप करण्यात आलेल्या सहकारी जमिनीवरील नियमभंगास माफी देण्याबाबत**

**(३९) १२९९९७ (०४-१२-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हातील सहकारी गृहनिर्माण संस्थाना निवासी उपयोगासाठी वाटप करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील नियमभंगास माफी देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या झालेल्या बैठकीत घेतला असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लाभ अंबरनाथच्या सूर्योदय सहकारी गृहनिर्माण संस्थेसह ठाणे जिल्ह्यातील इतर सहकारी गृहनिर्माण संस्थाना याचा लाभ होणार आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय बहुमजली इमारत बांधण्यात आलेल्या प्रकरणातील सदनिका हस्तांतरणाबाबतचा शर्तभंग नियामानुकुल करतांना भोगवटा प्रमाणपत्र असलेल्या किंवा नसलेल्या भूखंडाबाबत पहिल्या सदनिकेची प्रत्यक्ष विक्री किंवा नियोजन प्रधिकाऱ्यांनी दिलेली बांधकाम परवानगी किंवा भोगवटा प्रमाणपत्र या पैकी केलेल्या दस्ताऐवजाच्या दिनांकास असलेले जमिनीचे मुल्यांकन विचारात घेण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२५-०४-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) सूर्योदय सहकारी गृहनिर्माण संस्था, अंबरनाथ यांना निवासी प्रयोजनासाठी वाटप करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवरील आढळून आलेले शर्तभंग नियमानुकूल करणेबाबत महसूल व वन विभागाकडील क्र.जमीन-२७०६/प्र.क्र.६६/ज-४, दि.१३/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. तद्नंतर, उक्त दिनांक १३/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेल्या निर्णयासंदर्भात शासन निर्णय क्र.जमीन-२७०६/प्र.क्र.६६/ज-४, दिनांक १५/०९/२०१८ अन्वये सुधारीत व पूरक दिशा निर्देश शासनाने निर्गमित केले आहेत.

सदर शर्तभंग नियमितीकरणाची योजना सूर्योदय सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित व ठाणे जिल्ह्यातील इतर तत्सम सहकारी गृहनिर्माण संस्था यांना लागू आहे.

सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मूळ सभासदाला वाटप केलेल्या वैयक्तिक भूखंडावर जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय बहुमजली इमारत बांधून त्यातील सदनिका हस्तांतरणाबाबतचा शर्तभंग नियमानुकूल करताना भोगवटा प्रमाणपत्र असलेल्या / भोगवटा प्रमाणपत्र नसलेल्या भूखंडाबाबत पहिल्या सदनिकेच्या प्रत्यक्ष विक्री दिनांकास असलेले जमिनीचे मुल्यांकन किंवा नियोजन प्राधिकरण यांनी दिलेल्या बांधकाम परवानगीच्या दिनांकास असलेलेले जमिनीचे मुल्यांकन किंवा सदर भूखंडाबाबत झालेल्या प्रथम नोंदणीकृत दस्ताच्या (उदा. नोंदणीकृत विकसन करार, इ.) दिनांकास असलेले जमिनीचे मुल्यांकन किंवा भोगवटा प्रमाणपत्राच्या दिनांकास असलेले जमिनीचे मुल्यांकन, यापैकी जे प्रथम असेल त्या दिनांकास असलेले जमिनीचे मुल्यांकन विचारात घेऊन त्यानुसार ६२.५ टक्के रक्कम अनर्जित रकमेपोटी परिगणित करावी व अशी अनर्जित रक्कम संबंधित वैयक्तिक भूखंडावरील सर्व सदनिका धारकांमध्ये त्यांच्या सदनिकांच्या चटई क्षेत्राच्या प्रमाणात विभागून प्रमाणशीर वसूल करण्यात यावी, असे निर्देश उक्त शासन निर्णयान्वये देण्यात आले आहे.

---

## राज्यातील निराधार महिला व मुलींच्या स्वाधारगृहांना मिळणारे अनुदान

**(४०) १३००६३ (०५-१२-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निराधार महिला व मुलींच्या स्वाधारगृहांना मागील तीन वर्षापासून राज्य शासनाने अनुदान दिलेले नसल्यामुळे सदर स्वाधारगृहे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्वाधारगृहांना केंद्र शासनाकडून मिळणारे ६० टक्के अनुदान प्राप्त झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या स्वाधारगृहांचे मुल्यांकन न झाल्यामुळे राज्य शासनाकडून मिळणारे ४० टक्के अनुदान प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील स्वाधारगृहांचे मुल्यांकन तातडीने पूर्ण करून त्यांना मिळणारे अनुदान त्वरीत देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०५-२०१९) :** (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यात नवीन स्वाधारगृह योजनेस केंद्र: राज्य हिस्सा ६०:४० प्रमाणे दि. २३.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मुल्यांकनाअंती केंद् शासनाची मान्यता असलेल्या व राज्यात सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या संस्थांना सन २०१६-१७ व २०१७-१८ चे रु. ९,०२,१३,७५१/- इतके अनुदान अदा करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर शहरातील अष्टविनायक प्रतिष्ठानच्या अध्यक्षांनी बनावट दानपत्र केल्याबाबत**

**(४१) १३०२०४ (३०-११-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरातील अष्टविनायक प्रतिष्ठानच्या अध्यक्षांनी खासदार स्थानिक विकास निधी मिळविण्यासाठी मालकीची जागा नसतांना संस्थेच्या मालकीची जागा असल्याचे बनावट दानपत्र करून जिल्हाधिकारी, लातूर यांची फसवणूक केल्याचे दिनांक १० जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०४-२०१९) :** (१) सन २०१४ मध्ये दाखल तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर कडून स्थापन त्रिसदस्यीय समितीच्या दि.१५.०५.२०१४ रोजी प्राप्त झालेल्या अहवालातून सदर बाब निदर्शनास आली आहे.

(२) व (३) याबाबत त्रिसदस्यीय समितीमार्फत चौकशी करुन जिल्हाधिकारी, लातूर यांनी खासदार निधी अंतर्गत अष्टविनायक प्रतिष्ठान, लातूर यांना वितरीत केलेला रु.१०.०० लक्ष निधी १८% व्याज दराने वसूल करण्याचे आदेश दि.१९.०६.२०१४ रोजी दिले आहेत. त्याविरोधात अपिलार्थांनी विविध स्तरावर महसूली न्यायालयांमध्ये दाखल केलेल्या दाव्यांमध्ये जिल्हाधिकारी यांचे आदेश कायम ठेवण्यात आले. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठामध्ये दावा दाखल केला असता मा.उच्च न्यायालयाने जिल्हाधिकारी, लातूर यांचे व्याजासह निधी वसूलीचे आदेश रद्द केले. सदर आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करणे संयुक्तिक ठरणार नसल्याबाबातचे अभिप्राय सहायक सरकारी वकील यांनी दि.१२.०७.२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास कळविले, तथापि तद्नंतर संबंधित संस्थेवर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्याबाबतच्या

तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीसाठी नेमलेल्या जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांनी सादर केलेला अहवाल अभिप्राय व मार्गदर्शनार्थ जिल्हा सरकारी वकील यांचेकडे दि.०५.०९.२०१८ रोजी पाठविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये अनधिकृत वहानामधून विद्यार्थी वहातूक होत असल्याबाबत**

**(४२) १३०३८० (११-१२-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये ओम्नी, रिक्षा, इको आदी खाजगी वाहनांना प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे स्कुल परवाने नसतांनाही या वाहनातून हजारो विद्यार्थ्यांची वाहतूक सुरू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे, तद्नुसार अनाधिकृत वाहनातून विद्यार्थ्यांची होणारी वाहतुक थांबविण्याबाबत शासनाने कार्यवाही करुन संबंधित दोषीविंरध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०५-२०१९) :** (१), (२) व (३) शालेय विद्यार्थ्यांची अवैधपणे वाहतुक करणाऱ्या स्कूल बसेस व इतर खाजगी वाहनांची नियमितपणे तपासणी करण्यात येते. मुंबई (मध्य/पश्चिम/पूर्व) प्रादेशिक परिवहन कार्यालये व बोरिवली उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी माहे एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१८ या कालावधीत केलेल्या कार्यवाही दरम्यान ३३३५ वाहने तपासण्यात आली असून ९४५ वाहने दोषी आढळून आलेली आहे. त्यापैकी १५३ वाहनांचे परवाना/नोंदणी व १७१ वाहनांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आलेली आहे. सदर कारवाईतून रू.९,००,८४५/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे निरवडे (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथे बनावट सह्या करून खरेदी खत केल्याबाबत**

**(४३) १३०८९७ (३०-११-२०१८). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे निरवडे (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील श्री.कानू लक्ष्मण गावडे यांचे वारसांसोबत हातमिळवणी करून व त्यांच्या फसवणुकीने खोट्या सह्या घेऊन तत्कालीन मंडळ अधिकारी यांनी खरेदीखत क्रमांक ५६५/२०१६ व ७०८/२०१६ ही दोन्ही खरेदीखते केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खोट्या सह्या घेऊन करण्यात आलेली खरेदीखत क्रमांक ५६५/२०१६ व ७०८/२०१६ ही दोन्ही खरेदीखते तात्काळ रद्द करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी तत्कालीन मंडळ अधिकारी यांचे शासकीय सेवेतून निलंबन करण्याबाबत श्री.अनुपम कांबळी यांनी दिनांक ७ सप्टेंबर, २०१८ रोजी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-०५-२०१९) :** (१) नाही

(२) होय.

(३) श्री.अनुपम कांबळी यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, सावंतवाडी यांनी प्रकरणाची चौकशी केली असून सदर प्रकरणी तत्कालीन मंडळ अधिकारी आजगाव सरंनी अधिकार अभिलेखाच्या नियमानुसार कार्यवाही केल्याने ते दोषी नसल्याने त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करणे उचित वाटत नसल्याचे जिल्हाधिकारी सिंधुदूर्ग यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये नागरिकांची गैरसोय होत असल्याबाबत

**(४४) १३१०८३ (११-१२-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे दुचाकी तसेच चारचाकी वाहन चालविण्यासाठी परवाना काढणे, जुन्या वाहनाचे पासिंगचे काम यासाठी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये नागरिकांना वाहन वितरकांच्या अपॉईटमेंटसाठी दोन ते चार महिन्यापर्यंत वाट बघावी लागत असल्यामुळे नागरिकांची गैरसोयीचा होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयात दैनंदिन कामकाजासाठी ८० मोटार वाहक निरीक्षकांची गरज असुन सध्या ५० मोटार वाहक निरिक्षक सेवेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाहन तपासणीचे काम नियमबाह्य केले असल्यामुळे पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालातील १३ निरीक्षकांना निलंबित करुन केवळ ३७ अधिकाऱ्यांवरील निलंबन राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त प्रकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१५-०५-२०१९) :** (१), (२), (३) व (४) शासनाने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार काटेकोरपणे तपासणी न करता परिवहन वाहनांना योग्यता प्रमाणपत्रे

दिल्याप्रकरणी राज्यातील ६ उप/प्रादेशिक परिवहन कार्यालयातील एकूण ५२ अधिकाऱ्यांना निलंबित केलेले आहे. त्यामध्ये पुणे कार्यालयातील ९ मोटार वाहन निरिक्षक व ५ सहायक मोटार वाहन निरिक्षकांचा समावेश असल्याने कार्यालयातील दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला होता. परंतु, यामुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून अन्य उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकाऱ्यांना अतिरिक्त कामकाज देण्यात आले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्यालयात मोटार वाहन निरिक्षकांची ५८ पदे मंजूर असून, त्यापैकी ३२ पदे भरण्यात आली आहेत.

वरील निलंबित ५२ अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशी करण्यासाठी आवश्यकती दोषारोपपत्रे बजावण्यात आलेली असून, त्यापैकी ३७ अधिकाऱ्यांना शासन सेवेत पुर्नस्थापित करण्यात आले आहे. या ३७ अधिकाऱ्यांमध्ये पुणे कार्यालयातील ९ मोटार वाहन निरिक्षकांचा समावेश आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील विविध समस्या सोडविण्याबाबत**

**(४५) १३१७४६ (१५-१२-२०१८). श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे स्कूलबस, रुग्णवाहिका, रिक्षा इत्यांदी शेकडो वाहनाच्या कागदपत्रांची पूर्तता करून देखील ती पासिंगअभावी प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नेरूळ येथील ब्रेक टेस्टिंग ट्रॅकला स्थानिक रहिवाशांचा विरोध असल्यामुळे सदरचा ब्रेक टेस्टिंग ट्रॅक इतरत्र सुरु करण्याबाबत तसेच शहरातील अवैध व खाजगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या आणि विनापरवाना रिक्षा व इतर वाहन धारकांवर कायदेशीर कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांना दिनांक १५ ऑक्टोबर २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०५-२०१९) :** (१) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई या कार्यालयात ऑक्टोबर, २०१८ पासून योग्यता प्रमाणपत्र कामकाजासाठी ३ मोटार वाहन निरीक्षक व १ सहायक मोटार वाहन निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली होती. माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी येणा-या वाहनांची संख्या माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये जास्त प्रमाणात वाढल्याने सुरवातीला प्रलंबितता वाढली होती. तथापि, अन्य ठिकाणच्या अधिका-यांच्या सेवा अतिरिक्त स्वरुपात घेऊन प्रलंबितता कमी

करणात आली. तसेच माहे ऑक्टोबर २०१८ मध्ये स्कुलबस, रुग्णवाहिका, रिक्षा इत्यादी वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणाचे कामकाज प्राधान्याने करण्यात आले आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

जनहित याचिका क्र.२८/२०१३ या न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार नेरुळ येथील सेक्टर १९ येथे ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्यात आला असून मार्च २०१८ पासून वाहन तपासणीचे कामकाज करण्यात येत आहे. ब्रेक टेस्ट ट्रॅक विरोधात स्थानिक रहिवाशी यांनी मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१२९/२०१७ दाखल केली आहे. तथापि, मा. न्यायालयाने अंतिम आदेशाच्या अधीन वाहन तपासणीच्या कामकाजास परवानगी दिली आहे. उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई या कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत अवैध व खाजगी प्रवासी वाहतूक करणा-या तसेच विना परवाना रिक्षा व इतर वाहन धारकांवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुणालयात रुग्णांची होणारी गैरसोय

**(४६) १३२३४६ (०७-१२-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुणालयाच्या क्ष-किरण विभागातील सिटी-स्कॅन दुरुस्तीचे उपकरण गहाळ झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची रुग्णालय प्रशासनाकडून चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात रुग्णांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१९) :** (१) हे अंशत: खरे आहे.

गहाळ झालेली बाब उपकरण नसून सी.टी.स्कॅन मशीन दुरुस्त झाल्यानंतर मशीन व्यवस्थितपणे काम करीत आहे किंवा नाही याचे कॅलीब्रेशन करण्याकरीताचे साधन साहित्य आहे.

(२) होय.

याविषयी गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीच्या प्राथमिक अहवालानुसार पोलिस निरीक्षक, सीटी कोतवाली अकोला यांचेकडे तक्रार दाखल केली असून चौकशी सुरु आहे.

(३) सदर यंत्र बंद असण्याच्या कालावधीमध्ये नजिकच्या जिल्हयातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ व शासकीय रुग्णालय, अमरावती या ठिकाणी सी.टी.स्कॅन चाचण्यासाठी पाठविण्यात आले होते. सदर यंत्रसामुग्री सद्य:स्थितीत कार्यान्वित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवि मुंबई, वाशी येथील सेक्टर-१७ मधील दुकानातून खरेदी केलेल्या कॅडबरी चॉकलेटमध्ये मध्ये अळया व बुरशी आढळून आल्याबाबत**

**(४७) १३२८३३ (१९-११-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवि मुंबई, वाशी येथील सेक्टर-१७ मधील प्रभात ड्रायफुट या दुकानातून श्री.अमोल भाऊसाहेब जाधव यांनी मुलाच्या वाढदिवसानिमित्त दिंनाक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रभात ड्रायफुट, सेक्टर-१७, वाशी, नवि मुंबई या दुकानातून खरेदी केलेल्या PkD १२/०२/१८, A ८०२१२, B-२ असे कंपनीच्यावतीने प्रिंट केलेल्या ४० व ७२ युनिट असलेल्या तीन बॉक्स मधील कॅडबॅरी डेअरी मिल्कमध्ये अळया व बुरशी आढळून आल्याने त्यांनी सह आयुक्त, कोकण विभाग व अन्न व औषध प्रशासन, ठाणे यांच्याकडे दिंनाक १५ ऑक्टोबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार सदर कंपनी, होलसेल डिलर तसेच संबंधित दुकानदार यांच्या विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१४-०५-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) उक्त प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने चौकशी केली असून तपासणी वेळी तक्रारीत नमुद पॅकींग दिनांक व समूह क्रमांक असलेला साठा आढळून आला नाही. तथापि, उपलब्ध साठ्यातून कॅडबरी डेअरी मिल्क चॉकलेटचे दोन नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. प्रशासनाने सदर पेढीस सुधारणा नोटीस दिली असून फेरतपासणीमध्ये पेढीने त्रुटींची पुर्तता केली आहे. सदर नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.
तसेच सदर पेढीच्या पुरवठादार मे.मारु स्वीट सेंटर, मुंबई या पेढीमध्ये तक्रारीत नमुद चॉकलेटचा साठा आढळून आला नाही. सदर पेढीतून कॅडबरी डेअरी मिल्क चॉकलेटचे ०३ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून ते प्रमाणित घोषित झाले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील ससून रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबतत**

**(४८) १३३२०७ (०७-१२-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयात पश्चिम भागातील नागरिकांना उच्च दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हणून नवीन १० मजली इमारत बांधण्याचा प्रस्ताव मंजूर करून इमारातीच्या बांधकामास सुरवात करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी मागील ४ वर्षापासून त्यातील कक्षांना दारे खिडक्या बसविलेली नाहीत, वीज पुरवठा नाही, शस्त्रक्रिया कक्ष नाही तसेच अंतर्गत कामे देखील अपूर्ण अवस्थेत आहेत. हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अग्निशामक यंत्रणा, शस्त्रक्रिया कक्षेसह अद्यावत वैद्यकीय सुविधा यासाठी जानेवारी २०१८ मध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रस्ताव मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता तथापि सदर प्रस्ताव निधी अभावी मंजूर न झाल्याने इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याचे स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ससून रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे बांधकामास होणा-या विलंबास जबाबदार असण्या-यावर कारवाई करण्यासह या नव्या इमारतील स्थापत्य व वैद्यकीय अंतर्गत रचना करीता लागणारा निधी व निविदा मंजुरी करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०६-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भूसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील महाराष्ट्र पशु व विज्ञान विद्यापीठातंर्गत शासकीय मत्स्य महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(४९) १३३७४२ (०७-१२-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूसावळ (जि.जळगांव) तालुक्यातील महाराष्ट्र पशु व विज्ञान विद्यापीठातंर्गत शासकीय मत्स्य महाविद्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महाविद्यालय सुरु करण्यासाठी आर्थिक तरतूद करण्याकरिता लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार भुसावळ तालुक्यातील महाराष्ट्र पशु व विज्ञान विद्यापीठाअंतर्गत शासकीय मत्स्य महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (११-०६-२०१९) :** (१), (२) व (३) भूसावळ, जि.जळगांव येथे मत्स्य विज्ञान महाविद्यालय सुरु करणे व त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी केली असून यासंदर्भात महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्या कडून अहवाल मागविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पिंपरी चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील सहायक प्रादेशिक अधिकाऱ्याने सहकारी महिलेसोबत असभ्य वर्तन केल्याबाबत**

**(५०) १३३९१२ (१०-१२-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी चिंचवड उपप्रादेशिक प्ररिवहन कार्यालयात सहायक प्रादेशिक अधिकारी पदावर काम करणाऱ्या श्री.मेडशीकर यांने कार्यालयात काम करीत असलेल्या महिलेचा माहे, मे २०१७ ते ७ जून, २०१८ पर्यंत लैंगिक व मानसिक छळ तसेच विनयभंग केल्याने तिने या गंभीर प्रकरणाची लेखी तक्रार कार्यालयातील विशाखा समितीकडे केली असता संबधितावर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नसल्यामुळे पिडित महिलेने पिंपरी चिंचवड पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सहायक प्रादेशिक अधिकारी पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्याने पदाचा गैरवाफर करून सदर प्रकरणात हस्तक्षेप करून प्रकरण दडपण्याचा आणि स्वत:ला क्लिनचिट देण्याचा प्रयत्न करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करून पिडीत महिलेला न्याय देण्यासाठी संबधित सहायक प्रादेशिक अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०५-२०१९) :** (१) व (२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड या कार्यालयातील श्री.सुबोध मेडशीकर, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी लैंगिक तसेच मानसिक छळ केल्याबाबत त्याच कार्यालयात कार्यरत असलेल्या श्रीमती. शितल गोसावी, सहायक मोटार वाहन निरीक्षक यांनी तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२४.०८.२०१७ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये विशाखा समितीची नेमणूक करण्यात आली होती. विशाखा समितीने एकुण १० बैठका अंती तक्रारदार यांनी खोटा साक्षीदार समितीसमोर आणून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला असल्याने तक्रारदार यांना सक्त लेखी ताकीद देण्याची शिफारस केली होती. तसेच सदर प्रकरणाची उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (प) यांच्यामार्फत फेर चौकशी करण्यात आली असून त्यांनी तक्रारदार श्रीमती. गोसावी यांचेवर मानसीक, लैंगीक अत्याचार झाल्याचे दिसून येत नाही असे मत व्यक्त केले आहे.

श्रीमती गोसावी यांनी श्री. मेडशीकर यांचे विरुद्ध चिखली पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं १५/२०१८ भादंवि कलम ३५४, ३५४(अ), (१) (एक), २५४ (ड) (१)(एक), ५०९, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.